**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, JULY-AUG, 2019, VOL- 7/52*

# ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या

**गीता शिंदे, Ph. D.**

*सहाय्यक प्राध्यापक शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

**दिपक नाडे**

**Abstract**

*अनेक पराक्रमी सामाजिक उत्थानाच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या मातंग समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याचा इतिहास साक्ष आहे. एवढा दैदिप्यमान ऐतिहासिक वारसा माणसाच्या मनाला अस्वस्थ करणारा आहे. आजही आमच्या डोक्यावर झोपडी पाचवीला पुजलेली आहे. अनेक कुटुंबाच्या सकाळच्या जेवणाचा प्रश्न सुटला तरी संध्याकाळच्या जेवणाचा प्रश्न आ वासून उभा राहतो. परिणामी वणवण भटकंती अठराविश्व दारिदयामूळे अत्यल्प शिक्षणाचे प्रमाण कुचकामी शिक्षण पध्दतीमूळे विषतामूलक समाज व्यवस्थेचा परिणाम यातून बेकारी व समाजातील अनेक मंडळींनी नशाबाजी, जुगार, मटका, यासारंख्या वाईट गोष्टी अंघिकारल्या आहेत. देव, दैववाद, अंधश्रध्दा यामध्ये गुंग झालेले समाजमन इंटरनेटच्या युगातही बदलत्या परिस्थितीस अनुसरून न बदलत अजूनही पारंपारिक व्यवसाय करताना दिसतात. दिशादर्शक व त्यागमय ऐतिहासिक वारसा असणारा बहुजन समाजाच्या सामाजिक अभ्युदयाला गतिमान करणारा प्राचीन मातंगाचा वारसदार असणारा सद्यस्थितीतील मातंग समाज हा आज अशा निर्णायक टप्प्यावर मागे का पडतो आहे? याचे सिंहावलोकन करणे गरजेचे वाटते. (सोनवणे दा. २००९) .*

*समाजाचे हे चित्र बदलायचे असेल तर या समाजातील मुलामुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे. जे विद्यार्थी आज प्राथमिक शिक्षण स्तरावर शिक्षण घेत आहेत त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. त्या समस्यांचा विचार प्रस्तुत संशोधन प्रबंधात केला आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना:—

### ➢ सर्वसाधारण प्रस्तावना:—

भारतीय समाज हा विविध जातीधर्मांनी बनलेला आहे. जाती व धर्म हे पुर्वापार चालत आलेले दिसून येतात. प्राचीन वैदिक काळात जाती व धर्म व्यवस्था अस्तित्वात नव्हती तर वण अस्तित्वातहोती. त्यालाच चातुर्वण व्यवस्था असे म्हणत. त्या मध्ये ब्राम्हण, क्षत्रिय , वैश्य व शूद्र यांचा समावेश होतो. त्या काळी ज्ञान संपादनाचे व

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

ज्ञानदानाचे कार्य विशिष्ट अशा समाजाकडे होते. शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाही असे म्हटले जात असे.

चातुर्वणीय समाज व्यवस्थेून जाती उदयास आल्या. आज आधुनिक काळात देखील समाजातील काही जाती या आपल्या पुरातन व्यवसायाशीच बांधील असल्याचे दिसून येतात. त्याचे उदाहरण दयायचे झाले तर मातंग समाज हा प्राचीन काळापासून असलेला व्यवसाय म्हणजे गावातील मेलेल्या जनावरांची कातडी काढणे,दवंडी देणे,दोरखंड वळणे, केरसुणी बनविणे अशा प्रकारचे व्यवसाय करीत दिसून येतो. त्यामुळे मातंग समाजातील लोक हे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक या बाबतीत हीन व दीन ठरलेले आहेत.

मातंग समाजाची प्रगती ही इतर समाजाच्या तुलनेत कमीच आहे. त्याचे कारण म्हणजे त्या समाजातील असलेले अज्ञान. या अज्ञानामुळे ते स्वत:ला कमी लेखतात व शैक्षणिक प्रवाहापासून दूर जाताना दिसतात. त्याचे दूर जाणे हे समाजाच्या सर्वांगिण विकासास बाधक आहे. त्याचा परिणाम देशाचा विकासास अडथळा होतो.

शासनाने मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन त्यांना शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्या, विविध ठिकाणी आरक्षणाची सोय केली. परंतु गरजांची पूर्तता न झाल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. (वाघमारे,२००६)

**सैध्दांतिक पार्श्वभूमी:—**

‘बहूजन हिताय बहूजन सुखाय !’ असे म्हणत. सत्तेच्या व सामाजिक व्यवस्थेचा एवढया जाड भिंती निर्माण केल्या, की भिंतीच्या पलिकडचा बहुजन एकाकी झाला काळयाकभिन्न त्या जाड भिंतीकडे बघत बघत त्याचे मनही काळया दगडासारखे झाले. त्याला आता कशाचीही परवा उरली नाही. त्याच बहुजनाजील एक बहुजन मातंग या शब्दाचा अर्थ भाऊ असा होतो. जसे कम्युनिस्टांमध्ये कॉम्रेड म्हणजे भाऊ. तसेच मातंग म्हणजे भाऊ. तो भाऊ एकेकाळी कोण होता? याचा विचार करणे गरजेचे आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

इतिहासाची पाने चाळली असता प्राचीन काळापासून मातंग समाज हा राजे महाराजेंच्या भूमिकेत होता. कृष्णाचे गुरू सांदिपान ऋषिमुनी होऊन गेल्याचे दाखले पुराणांत मिळतात. किष्किंधा नगरीमध्ये मातंग समाजाच्या राजाचे साम्राज्य होते. भगवान बुध्दाच्या काही प्रमुख शिष्यांपैकी कश्यप हा शिष्य. पूर्वाश्रमीचा मातंग राजा प्रसेनजित हा सुद्‌धा मातंग समाजाचाच होता. यासारखे अनेक दाखले इतिहासात होऊन गेल्याचे दावा केला जातो. अगदी सोळाव्या शतकातले उदाहरण घ्यावये झाले तर छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीमध्ये छातीची ढाल करून जीवाची बाजी लावून किल्ल्यांचे रक्षण करणारे अनेक किल्लेदार मातंग समाजाचेच होते. हत्तीचे बळ असणारे येसाजी सारखे अनेक सैनिक मातंग समाजाचेच होते. नंतरच्या काळात शिवशाहीला मुठमती देऊन शिवशाहीच्या नावावर चालू असलेल्या ब्राम्हणशाहीला संपवून या राज्यामध्ये मानवी स्वातंत्र्य लढाईत रक्त सांडणाऱ्या महार रेजिमेंटमध्ये अनेक शुरवीरांपैकी काही शुरवीरही मातंग होते. पेशवाईच्या उत्तरार्धात आणि ब्रिटिशांच्या पूर्वार्धात निर्माण झालेल्या मानवी स्वातंत्र्याच्या अस्तित्वाच्या लढाईत संबंध बहुजन समाजाला आत्मरक्षणाची आणि समाजरक्षणाचे शिक्षण देऊन विषमतामूलक समाज व्यवस्थेमध्ये सन्मानाने जगण्यासाठी प्रवृत्त करणारे आणि संबंध देशातील स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या फुले दांपत्याच्या पाठीशी उभे राहणारे आदरणीय क्रांतीवीर वीर लहुजी साळवे हे सुध्दा मातंगच होते. १८५२ साली मुक्ता साळवे नावाच्या विदयार्थिनीने आपल्या निबंधात '' जो धर्म आम्हाला धर्म ग्रंथ वाचण्याची परवानगी देत नाही, तो धर्म आमचा कसा होऊ शकतो?'' असा सवाल करून ''आम्ही धर्म नसलेली माणस आहोत!'' अस सांगुन थेट धर्मनिरपेक्षतेशी नाते जोडणारी प्रथम बहुजन बाल निबंधकार मातंग समाजाचीच होती. '' ही पृथ्वी शेषाच्या मस्कावर तरलेली नसून ती दलित शोषित कष्टकरी आणि कामगार समाजाच्या तळहातावर तोलुन धरली आहे.'' असे सांगून इथल्या धर्म व्यवस्थेचा बुरखा फाडून दलित शोषितांचा इतिहास जगासमोर मांडत जग बदलण्याचे स्वप्न सामान्य माणसाच्या मनावर कोरणारे सत्याशोधक अण्णाभाऊ साठे मातंग समाजामध्येच जन्माला आले. संत परंपरेतील संत जनाबाई

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

ही सुध्दा मातंग असल्याचा दावा अलिकडे अनेक संत साहित्याचे अभ्यासक करताना दिसतात. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढाईत नांदेड जिल्हयाचा शाहीर पोचीराम कांबळे या मातंग समाजाच्या कायकर्त्यांने बलिदान देऊन खऱ्या अर्थाने नामांतराच्या चळवळीला जोम भरला होता.

ही व या सारख्या अनेक पराक्रमी सामाजिक उत्थानाच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या मातंग समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी असल्याचा इतिहास साक्ष आहे. एवढा दैदिप्यमान ऐतिहासिक वारसा माणसाच्या मनाला अस्वस्थ करणारा आहे. आजही आमच्या डोक्यावर झोपडी पाचवीला पुजलेली आहे. अनेक कुटुंबाच्या सकाळच्या जेवणाचा प्रश्न सुटला तरी संध्याकाळच्या जेवणाचा प्रश्न आ वासून उभा राहतो. परिणामी वणवण भटकंती अठराविश्व दारिदयामूळे अत्यल्प शिक्षणाचे प्रमाण कुचकामी शिक्षण पध्दतीमूळे विषतामूलक समाज व्यवस्थेचा परिणाम यातून बेकारी व समाजातील अनेक मंडळींनी नशाबाजी, जुगार, मटका, यासांरख्या वाईट गोष्टी अंघिकारल्या आहेत. देव, दैववाद, अंधश्रध्दा यामध्ये गुंग झालेले समाजमन इंटरनेटच्या युगातही बदलत्या परिस्थितीस अनुसरून न बदलत अजूनही पारंपारिक व्यवसाय करताना दिसतात. दिशादर्शक व त्यागमय ऐतिहासिक वारसा असणारा बहुजन समाजाच्या सामाजिक अभ्युदयाला गतिमान करणारा प्राचीन मातंगाचा वारसदार असणारा सद्यस्थितीतील मातंग समाज हा आज अशा निर्णायक टप्प्यावर मागे का पडतो आहे? याचे सिंहावलोकन करणे गरजेचे वाटते. (सोनवणे दा. २००९) .

समाजाचे हे चित्र बदलायचे असेल तर या समाजातील मुलामुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे. जे विद्यार्थी आज प्राथमिक शिक्षण स्तरावर शिक्षण घेत आहेत त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. त्या समस्यांचा विचार प्रस्तुत संशोधन प्रबंधात केला आहे.

- **संशोधन समस्येचे विधान:—** ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील समस्यांचा अभ्यास

- **कार्यात्मक व्याख्या:—**

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**ग्रामीण भाग :—** पुणे जिल्हयातील खेड, मावळ, मुळशी व हवेली या तालुक्यतील अनुक्रमे काळूस, नवलाख उंब्रे, म्हाळूंगे व लोहगाव चा भाग

➢ **समस्याः—** विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना येणाऱ्या शैक्षणिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक, समस्या

- **शैक्षणिक समस्या :** वाचन, लेखन व गणिती क्रियांबाबत समस्या.
- **कौटुंबिक समस्याः** कुटूंबातील अशैक्षणिक वातावरण, कलह वादविवाद वातावरण
- **आर्थिक समस्या :** कुटुंबाात नेहमी आर्थिक चणचण असते.
- **सामाजिक समस्याः** बोलीभाषामुळे शाळेत संभासणास अडचणी येतात.

➢ **संशोधनाची गरज व महत्वः—**

**संशोधनाची गरजः—**

भारतीय राज्य घटनेने शिक्षणातून वंचित राहिलेल्या मातंग समाजातील लोकांना अनेक सवलती दिल्या आहेत. नोकरीमध्ये राखीव जागा ठेवल्या आहेत. उच्च शिक्षणामध्ये वेगवेगळया प्रकारच्या शिष्यवृत्या प्रदान केल्या आहेत. तरी सुध्दा ग्रामीण भागात मातंग समाजातील लोकांना त्याची जाणीव नसल्याने या समाजातील विद्यार्थ्यांना सामाजिक आर्थिक शैक्षणिक समस्या जाणवतात. समाजातील सर्व थरांची प्रगती झाली तरच राष्ट्राची प्रगती होणार आहे. म्हणून ग्रामीण भागातील मातंग समाजातील प्राथमिक शिक्षणाच्या समस्यांचा अभ्यास करण्याची गरज आहे.

➢ **संशोधनाची महत्वः—**प्रस्तुत संशोधनाचे महत्व अनन्य साधारण आहे. हे महत्व पुढीलप्रमाणे—

१. प्रस्तुत संशोधनामुळे मातंग समाजातील कुटुंबांना आपल्या शिक्षणातील समस्यांची जाणीव होईल व ते मुलांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देतील.
२. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना ज्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्या जाणवतात त्यानुसार शाळेतील मुख्याध्यापकांना या समस्या दूर करण्यासाठी

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

कोणकोणत्या उपाययोजना राबविता येतील याचा विचार करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

३. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना ज्या समस्या निर्माण होतात त्या कमी करण्यासाठी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी यांना हे संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

➢ **संशोधनाची उद्‌दिष्टये:—**


१. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे.

२. मातंग समसजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक, आर्थिक, समाजिक समस्यांचा शोध घेणे.

➢ **संशोधकाची गृहीतके:—**शिक्षणातील समस्यांमुळे मातंग समाजाच्या प्रगत अडचणी येतात.

➢ **संशोधन कार्य पध्दती:—**प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दती अंतर्गत सामाजिक सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. कारण ही पध्दती वर्तमान काळाशी संबंधीत आहे.

**संशोधनाची पध्दती**



➢ **न्यादर्शन व न्यादर्शः—**

**अ) जनसंख्याः—**

पुणे जिल्हातील मातंग समाजातील प्राथमिक शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

**ब) न्यादर्शः—**

प्रस्तुत संशोधनात सहेतुक न्यादर्श निवड पध्दतीचा वापर करून पुणे जिल्हयातील खेड, मावळ, मुळशी व हवेली या तालूक्यातील अनुक्रमे काळूस, नवलाख उंब्रे, म्हाळुंगे व लोहगाव या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील ५ वी ते ७ वी प्रत्येकी तुकडीतील नोंदपटावर असलेले मातंग समाजातील सर्व विद्यार्थी.

➢ **माहिती संकलनाची साधने व तंत्रेः—** विद्यार्थी — प्रश्नावली

➢ **संशोधनाची व्याप्तीः—**

➢ **व्याप्तीः—**प्रस्तुत संशोधनाची समस्या संपूर्ण भारतभर असल्यामुळं संशोधनाची व्याप्ती खुपच मोठी आहे. प्रस्तुत संशोधन हे ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या समस्या समजण्यासाठी उपयुक्त आहे.

➢ **मर्यादाः—**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती संपूर्ण भारतभर असली तर संशोधकाने काही मर्यादा घालून घेणे अपरिहार्य वाटते. मर्यादा खालील प्रमाणे —

प्रस्तुत संशोधन फक्त प्राथमिक शैक्षणिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास केला आहे.

➢ **परिमर्यादाः—**

१. प्रस्तुत संशोधन पुणे जिलहयातील खेड, मावळ, मुळशी व हवेली या तालूक्यातील अनुक्रमे काळूस, नवलाख उंब्रे, म्हाळुंगे व लोहगाव गावातील मातंग समाजापुरतेच मर्यादित आहे.
२. प्रस्तुत संशोधन हे २०१३ — २०१४ या शैक्षणिक वर्षापुरते मर्यादित आहे.
३. प्रस्तुत संशोधनात संपूर्ण अनुसुचित जातीचा अभ्यास केलेला नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर संशोधकाचे नियंत्रण नाही.

➢ **संशोधनाची महत्वपुर्णता:—**

१. प्रस्तुत संशोधनामुळे मातंग समाजातील कुटुंबांना आपल्या शिक्षणातील समस्यांची जाणीव होईल व ते मुलांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देतील.

२. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना ज्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक समस्या जाणवतात त्यानुसार शाळेतील मुख्याध्यापकांना या समस्या दूर करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना राबविता येतील याचा विचार करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

३. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना ज्या समस्या निर्माण होतात त्या कमी करण्यासाठी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, समाज कल्याण अधिकारी यांना हे संशोधन महत्वाचे आहे.

➢ **संभाव्य ज्ञानात्मक योगदान:—**

प्रस्तुत संशोधन हे मातंग समाजातील विद्यार्थी व त्यांचे पालक यांना उपयोगी ठरणार आहे. त्याचप्रमाणे

१. प्रस्तुत संशोधन अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्याकरीता नवीन संशोधन करणाऱ्याला हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

२. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्या कमी करण्यासाठी शासनाला योग्य ती मदत करण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण आहे.

३. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समस्या जाणून घेऊन त्या समस्या सोडविण्याकरीता संस्था चालकांना प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

➢ **संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा:—**

प्रस्तुत संशोधनासाठी संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा घेण्यासाठी जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ तसेच शिक्षण संक्रमण, भारतीय शिक्षण यासारख्या मासिकातील आढावा घेतला आहे.

प्रस्तुत विषयाशी संबंधित खालील संशोधने आढळतात.

**संबंधित संशोधने:**

| **संशोधकाचे नाव** | **स्तर** | **वर्ष** | **शीर्षक** |
|---|---|---|---|
| चंद्रशेखर के. | पी.एच.डी. | १९६९ | अनुसुचित जातीच्या शैक्षणिक समस्या |
| आदित्य सिंह, एम. एच. रामनाथ | पी.एच.डी. | १९७४ | तमिळनाडू मधील अनुसुचित जाती व जमातीच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास |
| चिटनीस सु. भा. | पी.एच.डी. | १९७६ | महाराष्ट्रातील अनुसुचित जाती व जमाजीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास |
| जोशी. एस. डी. | पी.एच.डी. | १९८० | बडोदा जिल्हयातील वर्गीकृत जाती व जमातीच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास |
| प्रजापती जे.जे | पी.एच.डी. | १९८२ | अनुसुचित जातीच्या सामाजिक, आर्थिक,राजकीय, बदलांवर शिक्षणाचा होणारा परिणाम दाणापूर,उपविभाग, पटना विद्यापीठ |
| पाटील सु. उ. | पी.एच.डी. | २००६ | महाराष्ट्रातील कंजारभट जमातीच्या शैक्षणिक, सद्यस्थितीचा व शैक्षणिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे, त्यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे. |
| भोसले एस.एच. | एम.एड् | २००४ | अनुसुचित जाती व जमातीतील विद्यार्थ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास |
| जाधव एस.ए. | एम.एड् | २००८ | दौलावडगाव परिसरातील मातंग समाजातील युवकांच्या पदवी शिक्षणातील मागासलेपणाच्या कारणांचा अभ्यास. |
| आंबवडे जो. वा. | एम.एड् | २००९ | फासेपारधी समाजाच्या शैक्षणिक सद्यस्थितीचा अभ्यास |

प्रस्तुत संशोधनात कोष्टकातील आकडेवारीच्या आधारे त्या त्या कोष्टकाखाली अर्थ निर्वचन केले आहे. ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्याार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी शेकडेवारी काढली गेली. पुढील सर्व कोष्टकांमध्ये शेकडा प्रमाण दर्शविले आहे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

➢ **संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचनः—**

ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्याार्थ्यांच्या समस्यांच्या संदर्भात प्रश्नावलीव्दारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढील कोष्टकांव्दारे केले आहे. त्या प्रमाणे ८१ प्रतिसांदकांकडून प्राप्त माहितीच्या आधारे वर्गीकरण, विश्लेषण, व अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे केले आहे.

➢ **प्रश्नावलीवरून अर्थ निर्वचनः—**

**शैक्षणिक स्थिती (कोष्टक क्र. ०१)**

| तपशील | प्रश्न क्रमांक | होय प्रतिसाद | टक्केवारी | नाही प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| उत्तरे देता का | १ | ७१ | **८७.६५** | १० | १२.३ |
| शुध्द मराठी वाचन लेखन | २ | ७४ | **९१.३६** | ७ | ८.६४ |
| इंग्रजी शब्दांचे वाचन लेखन | ३ | ५४ | **६६.६७** | २७ | ३३.३ |
| हिंदीत संभाषण | ४ | ५८ | **७१.६** | २३ | २८.४ |
| गणिती क्रिया | ५ | ७९ | **९७.५३** | २ | २.४७ |
| खाजगी शिकवणी | ६ | १६ | **१९.७५** | ६५ | ८०.२ |
| आई वडील अभ्यास | ७ | ५० | **६१.७३** | ३१ | ३८.३ |
| शैक्षणिक साहित्य पालक देतात | ८ | ४८ | **५९.२६** | ३३ | ४०.७ |
| शिक्षक तुमच्या अडीअडचणी | ९ | ७७ | **९५.०६** | ४ | ४.९४ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार,

१. मातंग समाजातील ८८% विद्यार्थी शाळेत शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात तर १२% विद्यार्थी शाळेत शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत नाही.

२. मातंग समाजातील ९१% विद्यार्थी शुध्द मराठी वाचन लेखन करतात तर ९% विद्यार्थी शुध्द मराठी वाचन लेखन करत नाही.

३. मातंग समाजातील ६७% विद्यार्थी इंग्रजी शब्दांचे वाचन, लेखन करतात तर ३३% विद्यार्थी इंग्रजी शब्दांचे वाचन, लेखन करत नाही.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

४. मातंग समाजातील ७२% विद्यार्थी हिंदीत संभाषण करतात तर २८% विद्याथी हिंदीत संभाषण करत नाही.

५. मातंग समाजातील ९८% विद्यार्थी गणिती क्रिया करतात तर २% विद्यार्थी गणिती क्रिया करत नाही.

६. मातंग समाजातील २०% विद्यार्थी खाजगी शिकवणीला जातात तर ८०% विद्यार्थी शिकवणीला जात नाही.

७. मातंग समाजातील ६२% विद्यार्थ्यांचे आई वडील अभ्यास घेतात तर ३८% विद्यार्थ्यांचे आई वडील अभ्यास घेत नाही.

८. मातंग समाजातील ५९% विद्यार्थ्यांचे पालक शैक्षणिक साहित्य देतात तर ४१% विद्यार्थ्यांचे पालक शैक्षणिक साहित्य देत नाही.

९. मातंग समाजातील ९५% शिक्षक विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेतात तर ५% शिक्षक विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेत नाही.

➢ **अर्थनिर्वचनः—**

१. मातंग समाजातील विद्यार्थ्यांची प्राथमिक स्तरावरील शैक्षणिक प्रगती चांगली आहे.

२. आर्थिक परिस्थिती मुळे खाजगी शिकवणीसाठी विद्यार्थ्यांना पालक पाठवत नाहीत.

३. शिक्षक शाळेत मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांच्या अडचणी समजावून घेवून मार्गदर्शन करतात.

**कौटुबिक शैक्षणिक वातावरण (कोष्टक क्र. ०२)**

| **तपशील** | **प्रश्न क्रमांक** | **होय प्रतिसाद** | **टक्केवारी** | **नाही प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| वडिलांचे शिक्षण | २ | ७० | ८६.४ | ११ | १३.५८ |
| आईचे शिक्षण | ४ | ६१ | ७५.३ | २० | २४.६९१ |
| कोणी उच्चशिक्षित, पदवीत्तर | ६ | १४ | १७.३ | ६७ | ८२.७१६ |
| कोणाला व्यसन | ७ | ६३ | ७७.७ | १८ | २२.२२२ |
| पुढे शिक्षण घेण्याची इच्छा | ९ | ७५ | ९२.६ | ६ | ७.४०७४ |
| बाल विवाह | ८ | ० | ० | ८१ | १०० |
| अभ्यासासाठी स्वतंत्र खोली | १० | २१ | २५.९ | ६० | ७४.०७४ |
| अभ्यासासाठी पुरेसा वेळ | ११ | ५३ | ६५.४ | २८ | ३४.५६८ |

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादावरून,

१. मातंग समाजातील ८६% विद्यार्थ्यांच्या वडिलांचे शिक्षण झालेले आहे तर १४% विद्यार्थ्यांच्ये वडील निरक्षर आहेत.
२. मातंग समाजातील ७५% विद्यार्थ्यांच्या माता साक्षर आहे तर २५% विद्यार्थ्यांच्या माता निरक्षर आहेत.
३. मातंग समाजातील १७% कुटुंबातील व्यक्ती या उच्च शिक्षित आहेत तर ८३% कुटुंबातील कोणी उच्चशिक्षित नाहीत.
४. मातंग समाजातील ७८% विद्यार्थ्यांच्ये पालक व्यसनाधिन आहेत तर २२% विद्यार्थ्यांच्ये पालक व्यसन करत नाही.
५. मातंग समाजातील ९३% विद्यार्थ्यांना पुढे शिक्षण घेण्याची इच्छा आहे. तर ७% विद्यार्थ्यांना पुढे शिक्षण घेऊन उपयोग नाही असे वाटते.
६. मातंग समाजातील प्राथमिक शिक्षण घेण्याऱ्या १००% विद्यार्थ्यांच्या विवाह झालेला नाही.
७. मातंग समाजातील २५% विद्यार्थ्यांनाच अभ्यासाठी स्वतंत्र खोली आहे. तर ७१% विद्यार्थ्यांनाच अभ्यासासाठी स्वतंत्र खोली आहे.
८. मातंग समाजातील ६५% विद्यार्थ्यांनाच अभ्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. तर ३५% विद्यार्थ्यांनाच अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

➢ **अर्थनिर्वचन:—**

१. मातंग समाजातील विद्यार्थ्यांचे पालकांचे प्राथमिक शिक्षण पुर्ण झालेले आहे परंतु उच्च शिक्षित कोणीही नाही.
२. मातंग समाजातील विद्यार्थ्यांचे पालकांमध्ये व्यसनाचे प्रमाण अधिक आहे.
३. मातंग समाजात बालविवाह पध्दत नाही.
४. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळतो पण अभ्यासाला स्वतंत्र खोली नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आर्थिक स्थिती (कोष्टक क्र. ०३)**

| तपशील | प्रश्न क्रमांक | होय प्रतिसाद | टक्केवारी | नाही प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| सरकारी नोकरी | १ | ५ | ६.१७ | ७६ | ९३.८२७ |
| मालकीची शेती | ३ | ६ | ७.४१ | ७५ | ९२.५९३ |
| इतर कोणी कमावत | ४ | १४ | १७.३ | ६७ | ८२.७१६ |
| शेती आणि नोकरी व्यतिरिक्त इतर माध्यमातून | ५ | १३ | १६ | ६८ | ८३.९५१ |
| उत्पन्न पुरेसे | ७ | ० | ० | ८१ | १०० |
| तुमचा खर्च भागविणे शक्य | ८ | ४ | ४.९४ | ७७ | ९५.०६२ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार,

१. मातंग समाजातील ६% विद्यार्थ्याचे वडील सरकारी नोकरीला आहे तर ९४% विद्यार्थ्यांचे वडील सरकारी नोकरीला नाही.

२. मातंग समाजातील ७% विद्यार्थ्याच्या पालकांना शेती आहे तर ९३% विद्यार्थ्याच्या पालकांना शेती नाही.

३. मातंग समाजातील कुटूंब कर्त्या व्यतिरक्त कमावते असणाराचे प्रमाण १७% कुटुंब कर्त्या व्यतिरिक्त कमावते नसाणाराचे प्रमाण ८३% आहे.

४. मातंग समाजातील १३% विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला शेती आणि नोकरी व्यतिरिक्त इतर माध्यमातून उत्पन्न मिळत तर ४४% विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला शेती आणि नोकरी व्यतिरिक्त इतर माध्यमातुन उत्पन्न मिळत नाही.

५. मातंग समाजातील १००% विद्यार्थ्यांना कुटुंबाचे उत्पन्न पुरेसे वाटत नाही.

६. मातंग समाजातील ५% विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून घरचा खर्च भागवणे शक्य वाटते. तर ९५% विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून घरचा खर्च भागविणे शक्य वाटत नाही.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

➢ **अर्थनिर्वचन:—**

१. मातंग समाजातील विद्यार्थ्यांचे बहुतांश पालक सरकारी नोकरीत नसून मिळेल तेथे मोलमजुरी करतात.

२. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या बहुतांश पालकांना शेती नाही.

३. इतर कोणत्याही अन्य मार्गाने उत्पन्न मिळत नसून उत्पन्न पुरेसे नाही.

**सामाजिक स्थिती (कोष्टक क्र. ०४)**

| **तपशील** | **प्रश्न क्रमांक** | **होय प्रतिसाद** | **टक्केवारी** | **नाही प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| सर्व मुल, मुलीशी तुमची मैत्री | १ | ७९ | ९७.५३ | २ | २.४७ |
| कार्यक्रमात समाविष्ट करून घेतात | २ | ८० | ९८.७७ | १ | १.२३ |
| मुलांमध्ये मिसळण्यास आवडते | ३ | ७९ | ९७.५३ | २ | २.४७ |
| इतर मुले अभ्यासात मदत | ४ | ७८ | ९६.३ | ३ | ३.७ |
| इतर मुले खेळतात | ५ | ७९ | ९७.५३ | २ | २.४७ |
| लोकांकडून मान, सन्मान | ६ | ८० | ९८.७७ | १ | १.२३ |
| समारंभ, बारसे इ. कार्यक्रमात | ७ | ७९ | ९७.५३ | २ | २.४७ |

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार,

१. मातंग समाजातील ९८% विद्यार्थ्यांची वर्गातील इतर विद्यार्थ्यांशी मैत्री आहे व २% विद्यार्थ्यांची वर्गातील इतर विद्यार्थ्यांशी मैत्री नाही.

२. मातंग समाजातील ९९% विद्यार्थ्यांना शाळेतील, वर्गातील कार्यक्रमात शिक्षक समाविष्ट करून घेतात १% विद्यार्थ्यांना शाळेतील, वर्गातील कार्यक्रमात शिक्षक समाविष्ट करून घेत नाही.

३. मातंग समाजातील ९८% विद्यार्थ्यांना शाळेतील इतर मुलांमध्ये मिसळण्यास आवडते तर २% विद्यार्थ्यांना इतर मुलांमध्ये मिसळण्यास आवडत नाही.

४. मातंग समाजातील मुलांना ९६% इतर मुले अभ्यासास मदत करतात तर ४% इतर मुले अभ्यासास मदत करत नाहीत.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

५. मातंग समजातील मुलांशी ९८% इतर मुले खेळतात तर २% इतर मुले खेळत नाहीत.

६. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना ९९% गावाकडील लोकांकडून मान, सन्मान मिळतो. तर १% गावातील लोकांकडून मान, सन्मान मिळत नाही.

७. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना गावातील समारंभ, बारसे इ. कार्यक्रमात ९८% सहभागी करून घेतात. तर २% लोक सहभागी करून घेत नाही.

➢ **अर्थनिर्वचन :—**

१. मातंग समाजातील विद्यार्थ्यांशी सर्व शाळेतील मुले चांगला मैत्रिपूर्ण व्यवहार करतात.

२. मातंग समाजातील विद्यार्थ्यांशी सर्व शाळेतील शिक्षक सहकार्य व निरपक्षपाती वागणूक देतात.

३. मातंग समाजातील विद्यार्थ्यांना समाजाकडून पण चांगला मान मिळतो.

➢ **समारोपः—**

संशोधन संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात केलेले आहे. त्यावरून काढलेले निष्कर्ष पुढील प्रकरणात दिलेले आहेत.

➢ **उद्‌दिष्ट निहाय निष्कर्षः—**

**उद्‌दिष्ट क्र १. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे.**

१. आर्थिक परिस्थितीमुळे खाजगी शिकवणी लावू शकत नाहीत व पुरेसे शैक्षणिक साहित्य पालक देत नाहीत.

२. शाळेतील शिक्षक अडीअडचणी समजावून घेतात व सोडविण्याचा प्रयत्न व मार्गदर्शन करतात.

(कोष्टक क्र. ०१)

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**उद्‌दिष्ट क्र. २. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा शोध घेणे.**

१. ग्रामीण भागातील मातंग समाजातील विद्यार्थ्यांचे पालकांमध्ये व्यसनाचे प्रमाण अधिक असुन विद्यार्थ्यांसमोर उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळवल्याचा आदर्श नाही.

२. बहुसंख्य विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी कौटुंबिक वातावरण योग्य नाही. मुलांची पुढे शिक्षणाची इच्छा असूनही घरच्यांचा विरोध होतो कारण शिक्षणावर जास्त खर्च होतो. (कोष्टक क्र. ०१)

**उद्‌दिष्ट क्र. ३. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक समस्यांचा शोध घेणे.**

१. ग्रामीण भागातील मातंग समाजाच्या कुटुंबाला पुरेसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा खर्च ते भागवू शकत नाहीत. (कोष्टक क्र. ०३)

**उद्‌दिष्ट क्र. ४. मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्यांचा शोध घेणे.**

१. सर्व शिक्षक बहुसख्य विद्यार्थ्यांना शालेय कार्यक्रमात समाविष्ट करून घेतात सहकार्य करतात.

२. विद्यार्थ्यांकडून व समाजाकडून चांगली व सहकार्याची वागणूक मिळते.

➢ **उपाययोजनाः—**

१. शिक्षणाबद्‌दल मातंग समाजातील लोकांमध्ये उच्च शिक्षणा बाबत जाणीव जागृती करणे.

२. मातंग समाजात यशस्वी ठरलेल्या लोकांची माहिती विद्यार्थ्यांना देणे.

➢ **पुढील संशोधनासाठी विषयः—**

१. शहरी भागातील मातंग विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणातील सद्यस्थितीचा अभ्यास.

२. शहरी भागातील मातंग विद्यार्थी व ग्रामीण भागातील मातंग विद्यार्थी यांच्या शिक्षणातील तुलनात्मक अभ्यास करणे.

३. शहरी भागातील मातंग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणातील सद्यस्थितीचा अभ्यास.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. अनुसुचित जाती व जमातीतील मुलींच्या उच्च शिक्षणातील सद्यसिथतीचा अभ्यास.

**➢ प्रस्तुत संशोधने योगदानः—**

प्रस्तुत संशोधन हे मातंग समाजातील विद्यार्थी व त्यांचे पालक यांना उपयोगी ठरणार आहे. त्याचप्रमाणे.

१. प्रस्तुत संशोधन मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुबिंक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी नवीन संशोधन करणाऱ्याला हे संशोधन महत्वाचे ठरणार आहे.

२. प्रस्तुत संशोधन मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक समस्या कमी करण्यासाठी शिक्षकांना योग्य ती मदत करण्यासाठी हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

३. प्रस्तुत संशोधन मातंग समाजातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व शैक्षणिक समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याकरीता संस्था चालकांना हे संशोधन महत्वपूर्ण ठरणार आहे.

**➢ संदर्भसुचीः—**

**मराठी पुस्तकेः—**

*बापट,भा.गो. (१९९५), शैक्षणिक संशोधन, (तृतीय आवृत्ती), नुतन प्रकाशन पुणे*
*भिंताडे वि. रा. (२००६),शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे*
*दांडेकर वा.ना. (२००४), शैक्षणिक संख्याशास्त्र व मुल्यमापन, (सहावी आवुत्ती), श्री विद्या प्रकाशन, पुणे.*
*कदम चा. प. (२००७), शैक्षणिक संख्याशास्त्र, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.*
*मुळे रा.श. उमाठे. वि. तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, (तृतीय आवृत्ती) विद्या बुक्स, औरंगाबाद*

**इंग्रजी पुस्तकेः—**

*Best J.W.(2002, Research in Education,' New Delhi,Printic Hall,P-20)*
*Buch M.B.(1988-89) Fifth Survey of Educational Research Vol.II)*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**लेखः—**

*आंबेडकरांची भाषणे (५)*

*शिंदे देवानंद, दर्शन मातंग समाजाच्या वास्तवाचे, पुणे, सकाळ, शुक्रवार २५ ऑगस्ट २००७.*

**मासिकेः—**

*पाटील आनंद (२००२) सामान्य क्षमता चाचणी संपूर्ण मार्गदर्शक स्टडी सर्कल प्रकाशन.*

*पाटील अ. भी. (डिसेंबर २००७) शैक्षणिक संधीची समानता व शिक्षकांची भूमिका शिक्षण समिक्षा, नित्य नुतन प्रकाशन, पुणे.*